गुरूवार
१३.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३०७
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955








# गल्लीत गोंधळ,दिल्लीत मुजरा..!

## शिंदेंच्या सत्कारानंतर सेनेचे आमदार-खासदार शरद पवारांच्या भेटीला

मुंबई । वृत्तसेवा

गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील राजकारणात घडामोड घडताना दिसत आहेत. राज्यातील राजकीय घडामोडींना दिल्लीत वेग येऊ लागलाय. येत्या काही दिवसात महापालिका निवडणुकांची घोषणा होऊ शकते. त्याच पार्श्वभूमीवर राजकीय पक्ष मोर्चेबांधणी करत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार झाल्यानंतर आज शिवसेनेचे आमदार उदय सामंत आणि खासदार नरेश म्हस्के हे शरद पवारांच्या भेटीला गेले आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलंय.

मंत्री उदय सामंत हे दोन दिवसांपासून दिल्ली दौऱ्यावर आहेत. या दोन दिवसांपासून त्यांनी बैठकींचा धडका लावलाय. आता पवारांच्या भेटीला गेल्याने राज्यातील राजकारणाला राजधानी दिल्लीत फोडणी दिली जात असल्याचं दिसत आहे. काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेचा सत्कार शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर आज शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के आणि आमदार उदय सामंत आज शरद पवार भेटीला गेले आहेत. काल शरद पवार यांच्या हस्ते एकनाथ शिंदे यांचा सत्कार करण्यात आला होता. त्यावेळी शरद पवारांनी ▶▶पान २ वर



## शरद पवारविषयी काय म्हणाले एकनाथ शिंदे

शरद पवारांचे सासरे सदाशिव शिंदे हे क्रिकेटमध्ये गुगली टाकायचे. तर पवार साहेबांनी राजकारणात गुगली टाकतात. त्यांनी टाकलेली गुगली अनेकांना कळत नाही. कधी-कधी बाजूला बसलेल्या किंवा बसवलेल्या लोकांनाही त्यांची गुगली कळत नाही. पण माझ्याबद्दल थोडं वेगळं सांगतो. माझे पवार साहेबांशी प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यामुळे त्यांनी मला कधीही गुगली टाकली नाही, यापुढेही टाकणार नाहीत, असं विधान एकनाथ शिंदे यांनी सत्कारावेळी केले होते. राजकारणात वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये आपल्याला शिकायला मिळतं. वेगवेगळी विचारधारा असली तरी त्यांच्याशी संबंध जपावे लागतात. राजकारणात नातं कसे जपायचं हे पवार साहेबांकडून शिकावं असंही शिंदे म्हणाले. दुसरीकडे एकनाथ शिंदे यांचा सत्कार केल्यामुळे उद्धव ▶▶पान २ वर



## देवेंद्र फडणवीस सरकारकडून मनोज जरांगेंची 'ही' मागणी मान्य



जालना । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारकडून मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची महत्त्वाची मागणी मान्य करण्यात आली आहे. राज्य सरकारकडून निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या समितीला पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य सरकारने शिंदे समितीला ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार, शिंदे समिती आता हैदराबाद ▶▶पान २ वर

### ■ शासन निर्णयात नेमकं काय म्हटलंय?

मराठा समाजास मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक आणि प्रशासकीय तपासणी करण्याबाबत तसेच, तपासणीअंती पात्र व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती ▶▶पान २ वर

## सुदर्शन घुलेला दोन दिवसांची पोलिस कोठडी

बीड । प्रतिनिधी

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या सुदर्शन घुलेला खंडणी प्रकरणात केज न्यायालयात आज हजर करण्यात आले. यावेळी केज न्यायालयाने सुदर्शन घुलेला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. केज येथील आवादा एनर्जी पवनचक्की प्रकल्प चालकाकडून दोन कोटींची खंडणी मागितल्या प्रकरणी सुदर्शन घुलेसह इतर आरोपींवर केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. मात्र सुदर्शन घुलेला सरपंच देशमुख हत्या प्रकरणात अटक करण्यात आली होती. आता खंडणी प्रकरणात देखील सीआयडी कडून सुदर्शन घुलेची चौकशी केली जात आहे. आवादा कंपनीला मागितलेल्या खंडणीच्या गुन्ह्यामध्ये यापूर्वी वाल्मीक कराड आणि विष्णू चाटे यांची चौकशी झाली आहे. मात्र, सुदर्शन घुले याची चौकशी अद्याप बाकी आहे. सुदर्शन खुले याला आज सीआयडीचे उपअधीक्षक अनिल गुजर यांनी केज न्यायालयाच्या प्रथम वर्ग न्यायाधीश एस. व्ही. पावसकर यांच्या न्यायालयात हजर केले होते. यावेळी सीआयडीने सुदर्शन घुलेला ५ दिवसांच्या कोठडीची मागणी केली. परंतु, न्यायमूर्ती एस. व्ही. पावसकर यांनी सुदर्शन घुलेला १४ फेब्रुवारी पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या दोन दिवसांत सीआयडीकडून सुदर्शन घुले याची पुन्हा कसून चौकशी केली जाईल. पोलिसांकडून सुदर्शन घुले याच्या आवाजाचे नमुने तपासले जाणार आहेत. दरम्यान, चार दिवसांपूर्वीच सुदर्शन घुले याच्या मोबाईल मधील डाटा रिकव्हर करण्यात आला होता. तशी माहिती मयत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना दिली होती. तपासासंदर्भात दोन - तीन दिवसांनी धनंजय देशमुख हे सीआयडीच्या अधिकाऱ्यांची भेट घेत आहेत. सुदर्शन ▶▶पान २ वर



## सोयाबीन प्रश्नावर किसान सभा मैदानात

### उपजिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने




अंबाजोगाई । प्रतिनिधी

६ फेब्रुवारी रोजी सोयाबीन नोंदणी केलेल्या ४४ हजार ७४४ पैकी फक्त २० हजार ९६९ एवढ्याच शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करून सरकारने सोयाबीन खरेदी केंद्र बंद केल्याने एकूण जिल्हाभरात उर्वरित असलेल्या साधारण ५०% पेक्षाही जास्त सोयाबीन शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे.त्यामुळं शेतकऱ्यांच दिवाळं निघण्याची वेळ आली आहे. सरकारी खरेदी केंद्र बंद असल्याने खाजगी व्यापारी सुद्धा खरेदीसाठी धजावत नाहीत आणि खरेदी केलीच तर हमीभावाच्या तुलनेत अत्यंत ▶▶पान २ वर

## शहरातील अतिक्रमणांवर नगरपरिषदेची कारवाई

बीड । प्रतिनिधी

### पोलिसांचा तगडा बंदोबस्त



शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कारंजा, नगर रोड, जालना रोड भागातील अनेक ठिकाणी असलेल्या अतिक्रमणावर नगरपरिषदेने बुलडोझर फिरवून कारवाई केली. यामुळे रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. या कारवाईत स्वत: मुख्याधिकारी निता अंधारे रस्त्यावर उतरलेल्या दिसून आल्या तर यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अतिक्रमण काढले असलेतरी रस्त्यावरील खड्ड्यांचा मात्र प्रश्न कायम असून तेही बुजवून घ्यावीत अशी मागणी करण्यात येत आहे. शहरातील अनेक भागात रस्त्यांवर लहान सहान व्यवसाय करणाऱ्यांचे चहाच्या टपऱ्या, पान टपऱ्या सह इतरांनी अतिक्रमण केले होते. यामुळे वाहतुकीसह शहराचे विद्रुपीकरण होत असल्याने आज बुधवारी (दि.१२) नगरपरिषदेने कारवाई करीत बुलडोझर लावून अतिक्रमण पाडण्यात आली. याची सूचना मंगळवारी (दि. ११) नगरपरिषदेने शहरात अतिक्रमण काढून घेण्याचे लाऊडस्पिकरच्या माध्यमातून दिली होती. ज्यांनी अतिक्रमण काढले नाही अशा काही ▶▶पान २ वर

## परळीत कैलास फडवर गुन्हा दाखल

परळी । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीवेळी धनंजय मुंडे यांचा कार्यकर्ता कैलास फड याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्याला मारहाण केली होती. या प्रकरणी त्याच्यावर दोन महिन्यांनंतर पोलिसांनी कारवाई केली. कैलास फडच्या विरोधात परळी शहर पोलिस ठाण्यामध्ये मारहाणीचा गुन्हा दाखल झाला आहे. मतदानाच्या दिवशी कैलास फडने परळीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या सोबत असणाऱ्या माधव जाधव यांना मारहाण केली होती. याबाबतचा व्हिडिओही व्हायरल झाला होता. मात्र अद्याप फड विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. आता अखेर पोलिसांनी कैलास फडला दणका देत त्याच्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे. विधानसभा निवडणुकीदरम्यान परळी मतदारसंघात अनेक वादाच्या घटना घडल्या होत्या. ▶▶पान २ वर


**शरद पवार गटाच्या कार्यकर्त्याला केली होती मारहाण**

# गड 'कोट'

## बाबाच्या कवेत प्रतिबिंबित डीएम

क्रॉसलाईन

कुरापतीचे केवळ आरोप असलेल्या एका नेत्यावर जणू साडेसाती सूड उगवत असल्याचे चित्र स्पष्ट असताना, संत चरणी लीन होणाऱ्या नेत्याने व्रतस्थ होताना काल अनेकांनी पाहिले,निलेश आघाव यांनी काढलेला एक फोटो ज्यात धनंजय मुंडे भगवान बाबांच्या समाधीशेजारी ध्यानस्थ दिसत आहेत, बाजूच्या संगमवरीत डीएम प्रतिबिंबित झाले आणि तोच क्लिक समोर आला आणि लेकराला कवेत घेणारे ममत्व आणि महत्व समोर आले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात सर्वाधिक चर्चचे टोक,आरोपांचे टोक आरोपींच्या पेक्षा ज्या व्यक्तीकडे नाहक होते ते नाव म्हणजे धनंजय मुंडे, हत्येच्या कुठल्याच परिघात नसलेले डीएम मंत्री होऊ नयेत किवा त्यांनी राजीनामा द्यावा हि मागणी हत्येच्या अनुषंगाने कमी आणि राजकीय मत्सराने प्रेरित होती.वर पासून खाल पर्यंत अनेकांना डीएम यांच्यातला राजकीय स्पर्धक दिसत असल्याने, त्यांची राजकीय हत्या करण्याचे हरमुमकिन प्रयत्न पराकास्ठेत परावर्तीत झाले, डीएम म्हणजे २४ वर्षाचा संघर्षकुंभ काहींना तो काही दिवसात विझवून टाकायचा असावा, म्हणजे आप्त आणि गुप्त अश्या शत्रूंनी त्यांचा अभिमन्यू करण्याची एक ही संधी सोडली नाही. शेवटी पोरकं मन माऊलीचा पदर धरते , अगदी त्याच नैसर्गिक भावातून पाय पोटाकडे वळतात तसे, डीएम गडाकडे वळले आणि भगवानगडावर विसावा घेतला.भगवान गडाने लेकरू कवेत घेतले, जो गुन्हा केलाच नाही त्याची शिक्षा सहन करणारा वारकरी संप्रदाय नाही, त्यामुळे ▶▶पान २ वर






# यांनाही सरळ कराच!



सर्वोच्च न्यायालयाने दोन अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांस हात घातला असून ते तडीस नेल्यास काही मूलभूत बदल घडू शकतील. यातील पहिला मुद्दा आहे लोकप्रतिनिधित्व कायद्याचा आणि दुसरा राज्यपालांच्या वर्तनाचा. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता त्यावर भाष्य गरजेचे. भ्रष्टाचार वा अन्य गंभीर गुन्ह्याखाली एखाद्यास शिक्षा झाल्यास त्यास भविष्यात सरकारी नोकरीचे दरवाजे कायमचे बंद होतात. अशी गुन्हा सिद्ध झालेली व्यक्ती कोणत्याही सरकारी कार्यालयात साध्या शिपायाची नोकरी करण्यासही अपात्र ठरते. मात्र अशी शिक्षा झाल्यानंतर सहा वर्षांनी सदर व्यक्ती लोकप्रतिनिधी कशी काय होऊ शकते, असा कळीचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला असून या प्रकरणी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगास नोटिसा बजावल्या आहेत. सर्वोच्च न्यायालय या मुद्द्याचा फडशा पाडू इच्छिते असे दिसते. याचे कारण आमच्या नोटिशींस उत्तर आले नाही तरी या प्रकरणी सुनावणी सुरू राहील असे न्यायालयाने स्पष्ट केले असून त्यासाठी ४ मार्च ही तारीख न्यायालयाने मुक्रर केली. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपंकर दत्ता आणि मनमोहन यांनी या नोटिसा बजावल्या. सर्वोच्च न्यायालयाचा हा पवित्रा पाहून विविध शासकीय यंत्रणांनी त्यात आपले म्हणणे मांडण्याची इच्छा व्यक्त केली. याचा अर्थ सर्वोच्च न्यायालय 'रिप्रेझेंटेशन ऑफ द पीपल ॲक्ट' म्हणजे लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या दोन कलमांत बदल करू पाहते असा लावला जात असून तसे झाल्यास ही मोठी घटना ठरेल. हे पहिल्यांदाच होते आहे असे नाही. याआधीही निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांस संपत्ती आणि गुन्हे यांचा तपशील प्रतिज्ञापत्राद्वारे देणे बंधनकारक करण्याचा तसेच कोणत्याही गुन्ह्यात दोन वर्षे शिक्षा झाल्यास खासदारकी/आमदारकी आपोआप रद्द होईल असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानेच दिलेला आहे. याचा अर्थ लोकप्रतिनिधित्व कायद्यात याआधी दोन चांगल्या सुधारणा सर्वोच्च न्यायालयामुळेच झालेल्या आहेत. प्रत्यक्षात आल्यास ही आता तिसरी सुधारणा ठरेल. कोणताही सच्चा लोकशाहीप्रेमी या हस्तक्षेपाचे स्वागतच करेल. तथापि ते करताना आपल्या न्यायिक व्यवस्थेस अधिक नि:स्पृह आणि अधिक निष्पक्ष व्हावे लागेल. असे नमूद करण्याची गरज म्हणजे सध्या विरोधी पक्षीय नेत्यांविरोधात खटल्यांवर खटले दाखल करण्याची नवी राजकीय संस्कृती. अलीकडे काही राजकीय पक्षांचे विरोधकांचा केवळ निवडणुकीय पराभव करून समाधान होत नाही. या विरोधकांस वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यातून कसे संपवता येईल याचा नुसताच विचार केला जातो असे नाही तर त्याप्रमाणे मार्ग चोखाळले जातात. दिमतीला केंद्रीय यंत्रणा आहेतच. त्यामुळे सत्ताधीशांस विरोध करणाऱ्यांस राजकीय लढाईसाठी उसंत राहात नाही आणि ते या न्यायिक लढायांतच अर्धमेले होतात. त्याचमुळे; ''न्यायिक प्रक्रिया हीच आपल्याकडे मोठी शिक्षा असते'' (प्रोसेस इज द पनिशमेंट) असे उद्गार काढण्याची वेळ साक्षात माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यावर आली. अशा परिस्थितीत कोणत्या ना कोणत्या गुन्ह्यात विरोधकांस अडकवणे तितके अवघड राहात नाही. हे सर्व प्रत्यक्ष कोणा विशिष्ट राजकीय पक्षाकडून थेट होते असे नाही. पण या राजकीय पक्षाचे इतक्या संघटनांत इतके समर्थक आहेत की कोणीही उठून सत्ताधाऱ्यांस आडवे येणाऱ्यास आडवे करण्याचा हा उद्योग करू शकतो. त्यात निवडणूक आयोगाचा सरकारधर्म हा मुद्दा आहेच. एकेकाळी हिंदुत्वाच्या आधारे प्रचार केला म्हणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मताधिकार सहा वर्षांसाठी गोठवण्याचा निर्णय याच देशात घेतला गेला होता यावर विश्वास बसू नये; अशी आजची स्थिती. सर्व नियमांचा वरवंटा विरोधकांवरच फिरणार. अशा स्थितीत प्रमुख विरोधी नेते विविध आरोपांखाली दोषी ठरत गेले तर लोकशाहीच्या गळ्यालाच नख लागणार हे उघड आहे. तेव्हा आरोप सिद्ध झालेल्यांस लोकप्रतिनिधी बनता येऊ नये, हा सर्वोच्च न्यायालयाचा विचार स्तुत्य असला तरी त्याच्या अंमलबजावणीतील संभाव्य धोका दुर्लक्ष करू नये असा. तथापि राज्यपालांबाबत सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या भूमिकेबाबत मात्र असा कोणताही धोका दिसत नाही. सर्वोच्च न्यायालयात न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. महादेवन यांच्या पीठासमोर तमिळनाडू सरकार आणि राज्यपाल आर. एन. रवी यांच्या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. या रवींचा उदय चेन्नईच्या राजभवनात झाल्यापासून सरकार आणि राज्यपाल यांच्यात वारंवार खटके उडत असून प्राय: त्यास राज्यपालच जबाबदार दिसतात. मुख्यमंत्री स्टालिन यांच्या सरकारला जमेल तितके आडवे जाणे हा एकमेव मुद्दा या महामहिमांच्या कार्यक्रमपत्रिकेवर असावा. सरकारने, विधानसभेने पारित केलेल्या विधेयकाचे रूपांतर हे महामहीम सरळपणे कायद्यात होऊच देत नाहीत. अशी जवळपास १० विधेयके या महामहीम रवींनी कायदा होण्यापासून रोखली. वास्तविक सरकारने घेतलेल्या एखाद्या निर्णयावर राज्यपालांस काही आक्षेप असल्यास तो निर्णय सरकारकडे परत पाठवण्याचा अधिकार राज्यपालांस आहे. तसे झाल्यानंतरही विधानसभेने तो निर्णय तसाच्या तसा घेतला तर मात्र राज्यपालांस त्यावर सही करावी लागते. पण या महामहिमांचा खाक्याच वेगळा. सरकारने एखादे विधेयक मंजूर करून त्यांच्याकडे पाठवले तर ते बराच काळ त्यावर निर्णयच घेत नाहीत. हो नाही आणि नाहीही नाही. सरकारी निर्णय हे महामहीम जमेल तितका काळ उबवणार. त्यानंतर फारच बोंब झाली की तो निर्णय सरकारकडे परत पाठवणार. मग सरकार सर्व आवश्यक प्रक्रिया पुन्हा पूर्ण करून तो निर्णय या महामहिमांकडे पाठवणार. मग महामहीम पुन्हा त्याकडे दुर्लक्ष करणार आणि पुन्हा ओरडा झाला तर त्या निर्णयाचा चेंडू राष्ट्रपतींच्या अंगणात ढकलणार. म्हणजे निर्णय लटकला. राजकारणातील अतृप्त आत्म्यांस शांत करण्याचा मार्ग म्हणजे राज्यपालपद असे म्हणता येईल अशी सद्या:स्थिती. एकापेक्षा एक दिव्य महामहीम सध्या विविध राजभवनांत वास्तव्य करून आहेत. भाजपविरोधी सरकारची जमेल तितकी अडचण करणे हाच या महामहिमांचा एककलमी कार्यक्रम. महाराष्ट्रात भगतसिंग कोश्यारी यांनी घातलेला धिंगाणा याच जातकुळीतला. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या भगतसिंगास सहन केले. पण तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टालिन यांनी मात्र त्यांच्या महामहिमांस न्यायालयात खेचले. त्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू असून न्यायाधीश उपस्थित करत असलेल्या प्रश्नांतून या महामहिमाचे पुरते वस्त्रहरण होताना दिसते. ''तुम्ही विधेयक परत पाठवण्याची कारणे राज्य सरकारला सांगितलीत का'', ''तुम्हाला एखाद्या विधेयकावर निर्णय घ्यायला किती वेळ हवा'', ''तुमची स्वत:ची वेगळीच कार्यपद्धती दिसते'' अशा शेलक्या प्रश्नांद्वारे न्यायाधीश या महामहिमांच्या वर्तनातील नियमबाह्यता अशा प्रकारे दाखवून देत आहेत ती पाहिल्यावर माजी पोलीस अधिकारी असलेल्या या रवीने स्वत:हून राजभवनातून मावळायला हवे. पण तसे होण्याची काही शक्यता नाही. राजकारण्यांस लाजवेल इतके राजकारण अलीकडे राजभवनांतून खेळले जाते. त्याचमुळे ''राज्यपालांचे अधिकार संविधानापेक्षा अधिक नाहीत'' असे स्पष्ट मत नोंदवण्याची वेळ न्यायपालिकेवर आली. जे झाले ते योग्यच. पण ते तेथेच थांबू नये. राज्यपाल, त्या पदाची कार्यकक्षा, अधिकार आदींबाबत एकदाचा सोक्षमोक्ष काय तो लावायला हवा. ती वेळ आलेली आहे. देशाची घटनात्मकता आणि संघराज्य व्यवस्था अबाधित राखायची असेल तर या महामहिमांच्या उद्योगांस वेसण घालावी लागेल. राजकारण्यांना सरळ कराच, पण राजभवनी निवासींनाही सरळ करायची गरज आहे.

# सोयाबीनचे दर २०० रुपयांनी घसरले; सोयाबीन उत्पादक शेतकरी अडचणीत

धाराशिव, (वृत्तसेवा) :- सोयाबीन उत्पादक शेतकरी पुन्हा एखदा अडचणी सापडला आहे. सोयाबीनचे भाव दोनशे रुपयांनी उतरले आहेत. ऐकीकडे सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र बंद झाल्यानंतर बाजार समितीत सोयाबीनची आवक वाढली असतानाचा सोयाबीनचे भाव मात्र कमी झाले आहेत. यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. धाराशिव जिल्ह्यात सरकारी सोयाबीन खरेदी केंद्राकडे ३५ हजार ४०३ शेतकऱ्यांची विक्रीसाठी नोंदणी केली होती. यामध्ये केवळ १४ हजार २५७ शेतकऱ्यांचीच सोयाबीन खरेदी झाली. मात्र खरेदी केंद्राची मुदत संपल्याने एकट्या धाराशिव जिल्ह्यात २१ हजार नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची खरेदी रखडली आहे. हे शेतकरी आता बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्रीसाठी दाखल होत आहेत. मात्र याठिकाणी सोयाबीनला कमी भाव दिला जात आहे. धाराशिवच्या कळंब बाजार समितीमध्ये सोयाबीनला ३ हजार ७०० ते ४ हजार १०० रुपये क्विंटलचा भाव मिळत आहे.



बीड : सिरसमार्ग येथे संत गुरू रविदास महाराज जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या वेळी समाज बांधव व सिरसमार्ग ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मी अजित पवारांची भेट घेणार-आ.धस

## आका अन् आकाचा मुलगा म्हणत पुन्हा इशारा, बाहेर काढला घोटाळा

मुंबई, (वृत्तसेवा): बीड जिल्ह्यातील मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणानंतर बीडमध्ये संताप व्यक्त करत आरोपींच्या अटकेची मागणी करण्यात आली. त्यानंतर, राज्यभरात या घटनेचा तीव्र निषेध करत अनेक जिल्ह्यात मराठा बांधवांनी मोर्चेही काढले, देशमुख कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी लोकं रस्त्यावर उतरले होते. आष्टीचे आमदार सुरेश धस यांनीही हे प्रकरण लावून धरले होते, विधिमंडळातही त्यांनी हा मुद्दा उचलून धरला. त्यानंतर, याप्रकरणी आरोपीला अटक झाली असून पुढील तपास सुरू आहे. त्यातच, परळीतील महादेव मुंडे हत्याप्रकरण



आणि डीपीडीसीतील घोटाळा प्रकरणावरुन सुरेश धस (डीशीह वहरी) आक्रमक झाले आहेत. याप्रकरणी, आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन गेल्या ५ वर्षातील चौकशीची मागणी करणार असल्याचे आमदार धस यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले. बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आज अजित पवारांची भेट घेतल्यानंतर आमदार धस यांनी प्रतिक्रिया दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची आज बीडचे कलेक्टर अविनाश पाठक यांनी भेट घेतली. यासंदर्भात धस यांना प्रश्न विचारला असता, नियोजन विभागाने २ वर्षाच्या प्रशासकीय मान्यता मागितल्या आहेत, त्याबाबत त्यांनी अजित पवारांशी चर्चा केली आहे. मी अजित पवारांची भेट घेऊन ५ वर्षांच्या प्रशासकीय मान्यता चेक करण्याबाबत बोलणार आहे. कारण, सर्वाधिक जास्त घोटाळा २०१९ मध्ये झाला आहे. तर, ७२ कोटींच्या घोटाळ्याची यादी मी स्वत: अजित पवारांना दिल्याचे धस यांनी म्हटले. तसेच, २०१९ ते २०२२-२३ मधे सर्वाधिक भ्रष्टाचार झाला आहे. सध्या नियोजन विभागाने केवळ २०२४ आणि २०२५ ची चौकशी लावली आहे. मी उद्या अजित पवारांना विनंती करणार आहे, मागील ५ वर्षांची चौकशी करा. कारण, २५ जून २०२३ पर्यंत सर्वांत जास्त बोगस बिले काढण्यात आली आहेत, असेही धस यांनी म्हटले.

# गेला कृष्णा कुणीकडे?

## महाराष्ट्र, गुजरात पछाडलं तरी पोलिसांच्या तावडीतून सटकतोय , ६० दिवस झालं देतोय चकवा

बीड, (प्रतिनिधी) :-मस्साजोगचे मयत संतोष देशमुख हत्या प्रकरणात प्रमुख आरोपी असलेल्या कृष्णा आंधळे याचा अद्यापही काही ठावठिकाणा लागलेला नाही. गुन्हा घडून २ महिने उलटले असतानाही पोलीस त्याला पकडण्यात यश आलेला नाही. त्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून कृष्णा आंधळे गेला कुठे असा प्रश्न उपस्थित होत आहेत. बीडचा मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येने संपूर्ण राज्यभर पडसाद उमटले. आरोपीच्या अटके त्यासाठी ठिकठिकाणी मोर्चेही निघाले. या प्रकरणातील आठ आरोपींना अटक करण्यात आले आहे. सुदर्शन घुले सीआयडी कोठडीत तर इतर सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. सर्व आरोपीवर मोक्का देखील लागला आहे. मात्र दोन वेळा फरार घोषित करूनही कृष्ण आंधळे अद्याप पोलिसांना मिळत नाही. हत्या केल्यानंतर सर्व आरोपी एकाच गाडीने वाशीपर्यंत गेले. गाडी त्याच ठिकाणी सोडून आरोपी पळून गेले. त्याचा व्हिडीओही समोर आला.. मात्र नेमका कृष्ण आंधळे साठ दिवसानंतर ही सापडत नाही त्यामुळे कृष्णा गेला कुठे असा प्रश्न उपस्थित होत आहे.



## पान १ वरून

### महाराष्ट्रातील राजकारणाला...

एकनाथ शिंदेंचं कौतुक केलं होतं. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शरद पवार यांच्याविषयी स्तुतीसुमने उधळली. मात्र यावरून महाविकास आघाडीमधील मित्र पक्ष असलेल्या ठाकरे गटाने तीव्र नाराजी व्यक्त केलीय. जे लोक महाराष्ट्र तोडण्याची गोष्ट करत आहेत, त्यांचा सत्कार शरद पवार करत असल्याची टीका संजय राऊत यांनी केली होती. राऊतांच्या टीकेनंतर शिवसेनेच्या नेत्यांनी त्यांना आडेहात घेतलं. ते चॅप्टर संपत नाही तोच दुसरा राजकारणातील दुसरा पाडाव पडलाय. आज शिंदे गटाचे राज्यातील उद्योग मंत्री उदय सामंत आणि खासदार नरेश म्हस्के हे शरद पवारांच्या भेटीला गेले आहेत.

### शरद पवारविषयी काय...

ठाकरे नाराज झालेत. संजय राऊत यांनी शरद पवार यांच्यावर जळजळीत टीका केली. शरद पवार यांनी एकनाथ शिंदे यांचा नव्हे तर अमित शाह यांचा सत्कार केला, अशी टीका संजय राऊत यांनी केली. राज्याचे तुकडे करणाऱ्या अमित शाह यांचाच सत्कार केलाय, अशी टीका संजय राऊतांनी पत्रकारांशी बोलताना केली. संजय राऊतांच्या वक्तव्यानंतर शरद पवार गट राष्ट्रवादी आणि ठाकरेंची शिवसेना यांच्यातील दुरावा दिसून येतोय. तसेच शरद पवार यांनी दिल्लीतील कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांच्यावर स्तुतीसुमने उधळली यावरही संजय राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

### देवेंद्र फडणवीस सरकारकडून...

गॅझेट, बॉम्बे गॅझेट आणि सातारा गॅझेटचा देखील अभ्यास करेल. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचे सातवे उपोषण सोडताना सरकारने शिंदे समितीला मुदतवाढ देऊ म्हणून आश्वासन दिलं होतं. शिंदे समितीची ३१ डिसेंबर २०२४ रोजी मुदत संपली होती. तेव्हापासून शिंदे समितीने काम थांबवल्याच पाहायला मिळालं होतं. अंतरवाली सराटीत मनोज जरांगे यांच उपोषण सोडताना भाजपचे आमदार सुरेश धस यांनी शिंदे समितीसह इतर तीन मागण्यांसाठी सरकार सकारात्मक असल्याचं म्हटलं होतं. त्यानंतर आज सामान्य प्रशासनाकडून शिंदे समितीला मुदतवाढ देण्याचा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी १५ फेब्रुवारीपासून अंतरवली सराटीत साखळी उपोषण करणार असल्याची घोषणा केली आहे.

### शासन निर्णयात...

विहित करण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयान्वये मा. न्यायमूर्ती श्री. संदीप शिंदे (निवृत्त) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. सदर समितीची कार्यकक्षा संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये सदर समितीस दि.३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत देण्यात आलेली मुदतवाढ संपुष्टात आली असल्याने सदर समितीस दि.३० जून, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे, असं शासन निर्णयात म्हटलं आहे. हैद्राबाद गॅझेट, सातारा गॅझेट व बॉम्बे गॅझेट लागू करण्याबाबत मा. न्यायमूर्ती शिंदे (निवृत्त) समितीकडून अभ्यास करण्यात येईल, असंही या शासन निर्णयात म्हटलं आहे.

### सोयाबीन प्रश्नावर...

कमी किंमतीत म्हणजे साधारण ३८०० रुपये प्रतिक्विंटल ने खरेदी केला जातो आहे.यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे या शासकीय खरेदीची तारीख वाढवण्याकडे मोठ्या अश्याने त्यांचे डोळे लागले असताना,परवा पणन मंत्र्यांनी स्पष्टपणे खरेदीसाठी मुदत वाढ नसल्याचे स्पष्ट करून शेतकऱ्यांच्या संयमावरच घाव घातला आहे. एवढ्यावरच हे शोषण न थांबता ज्या शेतकऱ्यांनी गेल्या दोन महिन्यापासून शासकीय खरेदी केंद्रावर आपले सोयाबीन विक्री केले आहे त्यांचे बिल अद्याप देखील या सरकारने अदा केलेले नाही. आणि त्यामुळे खरेदी झालेल्या शेतकरी सुद्धा अडचणीत आलेला आहे.संबंध राज्यभरात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांमध्ये या निर्णयाच्या विरोधात रोष दिसत असून त्याचे पडसाद आपल्या जिल्ह्यात आत्ता पाहायला मिळू लागले आहेत. नेहमीच शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलनात जिल्हाभर आघाडीवर असलेली किसान सभा या सोयाबीन खरेदी केंद्र प्रश्नावर मैदानात उतरलेली आहे.किसान सभेच्यावतीने उपजिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई या ठिकाणी जोरदार घोषणाबाजी करून या सरकारी धोरणाचा निषेध करून निदर्शने करण्यात आली. यामध्ये १.केंद्र सरकारने सोयाबीन खरेदी केंद्रांना मुदत वाढ देवुन संपूर्ण खरेदी होईपर्यंत खरेदी केंद्र चालू ठेवावे २.संपूर्ण सोयाबीन किमान हमीभावानेच खरेदी करा अन्यथा भावांतर योजनेअंतर्गत फरक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा.३.गेल्या दोन महिन्यापासून खरेदी करत असलेल्या सोयाबीनचे थकीत बील तात्काळ देण्यात यावी या प्रमुख मागण्या करण्यात आल्या. यावेळी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष ॲड.अजय बुरांडे, मुरलीधर नागरगोजे, कॉम्रेड उत्तरेश्वर इंगोले रवींद्र देवरवाडे जगन्नाथ घाळे, सय्यद खुर्शीद आत्माराम पवार एडवोकेट शिवाजी कांबळे मस्के सर राष्ट्रपाल पाटोळे मुक्तार भाई व्यंकटेश देशमुख इत्यादी उपस्थित होते.

### शहरातील अतिकमणांवर...

व्यसायीकांचे हातगाडे आणि टपाऱ्या तोडण्यात आल्या आहेत. ही मोहीम शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कारंजा रोड, नगर रोड तसेच जालना रोडवर राबविण्यात आली. इतरही भागात अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येणार आहे. या अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आल्याने शहरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. यामुळे समाधान व्यक्त करण्यात येत असला तरी काही रस्ते पण खड्ड्यात हरवलेले आहेत. त्यामुळे अशीच भूमिका घेत नगरपरिषदेने ही खड्डे बुजवून घ्यावीत अशी मागणी करण्यात येत आहे.

### परळीत कैलास फडवर...

राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकर्त्यांकडून अनेक गैरप्रकार करण्यात आल्याचा आरोप शरद पवारांच्या राष्ट्रवादीने केला होता. त्यातच २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानादिवशी कैलास फड आणि त्याच्या साथीदाराने शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुखांचा कार्यकर्ता माधव जाधव यांना मारहाण केली होती. परळी शहरातील बँक कॉलनी परिसरात हा प्रकार घडला होता. याप्रकरणी माधव जाधव यांनी पोस्टाद्वारे तक्रार नोंदवली होती. याच प्रकरणात राजेसाहेब देशमुख यांच्यासोबत असलेल्या पोलिस गार्डचा जबाब घेण्यात आला. त्यानुसार कैलास फडच्या विरोधामध्ये मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र गुन्हा नोंदवण्यास एवढा विलंब का लावला? असा सवाल देखील उपस्थित होत आहे. विधानसभा निवडणूक २०२४ च्या मतदानादरम्यान परळी विधानसभा मतदारसंघांत बोगस मतदान होत असल्याची तक्रार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी केली आहे. यादरम्यान परळी शहरातील बँक कॉलनी परिसरातील मतदान केंद्रावर राजेसाहेब देशमुख मतदान केंद्रातील माहिती घेत असताना माधव जाधव यांना तीन ते चार जणांनी मारहाण केली. माधव जाधव यांना परळी मध्ये मारहाण झाल्यानंतर त्याचे पडसाद घाटनांदुर येथे उमटले होते. घटनांदूर येथे मतदान केंद्रात मतदान चालू असतानाच काही कार्यकर्त्यांनी मतदान केंद्रात घुसून तोडफोड केली होती. मागील वर्षी दिवाळी दरम्यान परळीच्या बँक कॉलनीतील घराजवळ वाहन पूजा करत असताना एका तरुणाने रिव्हॉल्व्हरमधून हवेत फायरिंग केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या प्रकरणी कैलास फड याच्यावर काही दिवसांपूर्वी परळी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. तसेच त्याला अटकही झाली होती.

### सुदर्शन घुलेला दोन...

घुलेच्या मोबाइलमधील डेटा रिकव्हर झाला असून तो पूर्ण हस्तगत करण्यात आला आहे. त्याचबरोबर विष्णू चाटेच्या मोबाइलमधील डेटा रिकव्हर केला असून दोघांच्या मोबाइलमधील काही गोष्टी या तपासात अडथळा येऊ नये म्हणून तपास पूर्ण होईपर्यंत गोपनीय ठेवल्या आहेत, असेही धनंजय देशमुख यांनी सांगितले होते. सुदर्शन घुले हा बीडच्या केज तालुक्यातील टाकळी येथील रहिवासी आहे. तो अवघ्या २७ वर्षांचा आहे. त्याचे शिक्षण इयत्ता सातवीपर्यंत झालेले आहे. तो आपल्या कुटुंबातील एकुलता एक आहे. त्याच्या वडिलांचे यापूर्वीच निधन झाले होते. त्यामुळे तो व त्याची आई असे दोघेच जण त्याच्या कुटुंबात आहेत. सुदर्शन घुलेकडे २-४ एकर कोरडवाहू जमीन आहे. पण त्याला शेती कसण्यात अजिबात रस नव्हता. त्यामुळे त्याने ऊसतोड मजुरांचा मुकादम म्हणून काम करण्यास सुरुवात केली. हे काम करताना तो कामावर न येणाऱ्या मजुरांकडून वसुली करण्याचे कामही करत होता. ऊसतोड मुकादम ते खंडणीखोर असा त्याचा गुन्हेगारीचा आलेख उंचावत गेला.

### गड'कोट'........

भगवान बाबांचा वारकरी डीएमचा कोट होताना दिसला . समाधीच्या नजीक स्तब्ध झालेले व्रतस्थ जेव्हा थेट समाधीत प्रतिबिंबित झाले तेव्हा तर जणू हा कौल ठरावा कि , लेकराला मी घेतोय माझ्या कवेत करतोय सुरक्षित.ङ्ग धनंजय एकटा पडला पाडला,ज्यांच्या पाठीशी ते धीरोत्त राहिले त्या पदरांना देखील डीएमच्या कोंडीत संधी दिसली , ती साधण्याची शक्कल हि लढवली.मानवी वृत्ती कृत्तीच्या बाहेर गेलेल्या अन्यायाला दाद मागायला माणूस दैवी चरण शोधतो आणि आपसूक डीएम गडावर पोहोचतात.भगवान गड हा उपेक्षित अन्यायग्रस्त भूमिकांचा कायापालट आहे , म्हणूनच डीएम तिथे स्थिरावणे उचित आणि नैतिक ठरते. जातीय द्वेषाने किवा प्रेमाने भूमिका शब्दबद्ध रस्तेबद्ध होऊ लागल्या कि मग तर्क शून्य होतो आणि जात आंधळेपण कुणाच्या मुळावर तर कुणाच्या कुळावर उठते,सत्य कडवे म्हणून कुणी लिहूच नये असे थोडीच आहे . एक नेता बनायला तप जात , हा नेता तर दोन तपाने सुलाखून निघालेला आहे,ते जपणे इथल्या माती माणसांचे कर्तव्य आहे , शेवटी ज्या झाडाचे फळे चाखायची ते झाड राखणे देखील नैसर्गिकच .गड पाठीशी राहिला तोच या भावनेतून असे लोकांना वाटते आहे . धर्मसत्ता आणि राजसत्ता भले वेगळ्या असतील मात्र समाजाचे भले करताना एकमेकांच्या सानिध्यात या दोन्ही सत्ता नेहमी दिसल्याच कि , महाभारतात धर्मसत्ता गीता सांगताना आणि राजसत्तेने ऐकताना आम्ही पाहिलेलं आहे , त्यामुळे जर कुणी म्हणत असेल कि धर्मसत्तेने राजसत्तेच्या पाठीशी राहू नये तर ते अतार्किक ठरते,गडांची स्थापना करण्यास निकष नसतील तर गडांच्या कुशीत बालकांना घेण्यास कुणी का प्रव्रत करावे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### शेतकऱ्याची मुलगी झाली मंत्रालय लिपिक





**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील बऱ्हाणपूर या छोट्याशा गावातून हलाकीच्या परिस्थितीमध्ये कुटुंब चालवत असलेले एक सर्व साधारण शेतकरी दिगंबर आत्माराम लांडे यांची मुलगी जिद्द, चिकाटी व प्रयत्नांची पराकाष्टा लावून आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुणे या ठिकाणी स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी गेली आणि शेवटी आपल्या वडिलांचे व स्वतःचे स्वप्न साकार करून तिने M.P.S.C परीक्षा मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेतून मंत्रालय लिपिक ही पोस्ट मिळवली यामुळे सर्वत्र तिचे कौतुक व अभिनंदन होत आहे. त्याचबरोबर विशेष कामगिरी केल्याबद्दल बऱ्हाणपूर ग्रामपंचायत सरपंच गणेश लांडे, ह.भ.प.आर्जून महाराज गवारे सिद्धेश्वर शिरसागर, गोरख महाराज लांडे, बिबीशन शिरसागर सर, भिलारे महाराज, दिगांबर लांडे समाधान लांडे यांनी तिचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या.

### भारतीय बौध्द महासभेची दि.१५ फेब्रु रोजी बीड जिल्हा (पश्चिम) महिला कार्यकारिणीची निवड बैठक

**बीड । प्रतिनिधी**

संस्थेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ.भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या आदेशान्वये राष्ट्रीय उपाध्यक्षा महिला आयु.नि.सुषमाताई पवार यांच्या मार्गदर्शनानुसार बीड जिल्हा (पश्चिम) महिला कार्यकारिणीची निवड करण्याकरीता आयु.नि.रागिनीताई पवार केंद्रीय महिला विभाग तसेच आद.स्वातीताई शिंदे राज्याध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता कार्यालय भारतीय बौध्द महासभा बसस्टॅण्ड जवळ बीड येथे बैठक आयोजित करण्यात आली असून या बैठकीस केंद्रीय शिक्षिका, उपासिका, महिला विभागाच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्या तसेच महिला सैनिक या सर्वांना निमंत्रित करण्यात येत असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धम्म दिक्षा घेण्या अगोदर स्थापन केलेल्या भारतीय बौध्द महासभेच्या धम्म प्रचार व प्रसाराकरीता तसेच जनतेमध्ये परिवर्तन घडवून आणण्याकरीता आपल्या सहकार्याची अत्यंत आवश्यकता असून सदर बैठकीस आपण वेळेवर उपस्थित रहावे ही निम्र विनंती.

### संस्कार विद्यालयात संत शिरोमणी गुरु रविदासजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**बीड । प्रतिनिधी**

संस्कार विद्यालयातील इयत्ता तिसरी चौथी विभागात भारतातील राष्ट्रीय संत शिरोमणी रविदासजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम तिसरी चौथी विभागाचे विभागप्रमुख गिरी सर आणि कार्यरत सेवक महादेव माने यांच्या हस्ते गुरु रविदासजी महाराज आणि देवी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तथा विभाग प्रमुख सुरेश गिरी सर यांनी संत रविदासजी महाराज यांच्या जीवनकार्या विषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली, मार्गदर्शन केले. याप्रसंगी तिसरी चौथी विभागातील शिक्षकवृंद,कर्मचारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन साळुंके ताई यांनी तर आभारप्रदर्शन पानखडे ताई यांनी केले.

# जिल्हास्तर खेलो इंडिया कबड्डी केंद्र, बीड क्रीडा मार्गदर्शकांची मानधन तत्त्वावर नियुक्ती होणार

**बीड । प्रतिनिधी**

केंद्रशासनाच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या खेलो इंडिया या योजने अंतर्गत देशातील विविध जिल्ह्यामध्ये १००० खेलो इंडिया केंद्र पुढील ४ वर्षामध्ये निर्माण करण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत बीड जिल्ह्यास कबड्डी या खेळाचे केंद्र सुरु करण्यास मान्यता प्राप्त झाली त्यानुसार जिल्हा क्रिडा संकुल, बीड येथे केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदर योजनेचा उद्देश जिल्ह्यातील उत्कृष्ट १५ मुले व १५ मुली खेळाडूंची निवड करुन त्यांना तज्ञ प्रशिक्षकाद्वारे तंत्रशुध्द प्रशिक्षण देऊन प्रतिभावान खेळाडू तयार करणे हा आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीडला मंजूर झालेल्या खेलो इंडिया कबड्डी केंद्रावर प्रशिक्षण देण्यासाठी पुढील अर्हताप्राप्त प्रशिक्षकांची नियुक्ती मानधन तत्वावर करावयाची आहे.

प्रशिक्षक अर्हता:- १) वयोगट १८ ते ४५ वर्षे यामध्ये अतिउच्च कामगिरी / गुणवत्ता / एशियन गेम्स / जागतिक अजिंक्यपद अधिकृत स्पर्धा सहभाग / पदक प्राप्त व प्रशिक्षणाच्या अनुभवासह ३) जागतिक करंडक स्पर्धा / एशियन चैंपीयनशीप / साऊथ एशियन स्पर्धा / संबंधित खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा सहभाग / पदक प्राप्त खेळाडू - प्रशिक्षणाच्या अनुभवासह, ४) राष्ट्रीय किंवा राज्य पुरस्कार्थी प्रशिक्षणाच्या अनुभवासह, ५) एनआयएस पदविका किंवा संबंधित खेळाचे अधिकृत लेवल कोर्सेस किंवा बी.पी.एड्. एम.पी. एड. सह राष्ट्रीय स्पर्धा पदक प्राप्त किंवा नॅशनल गेम्स पदक प्राप्त - प्रशिक्षणाच्या अनुभवासह, ६) राज्यस्तर खेळाडू बी.पी.एड., एम.पी.एड. सह कमीत कमी १० वर्ष प्रशिक्षणाचा अनुभव. प्रशिक्षकांची नियुक्ती ही तात्पुरती स्वरुपाची निवळ मानधन तत्त्वावरील आहे. प्रशिक्षक मानधन हे प्रति महिना १५,०००/- ते रुपये २५,०००/- एवढ्या स्वरुपात असेल. प्रशिक्षकांचा परफॉर्मन्स आढळून न आल्यास त्यास जिल्हास्तर खेलो इंडिया केंद्र नियंत्रण व देखरेख समिती, बीड कधीही प्रशिक्षक पदावरुन दूर करेल. वरील अर्हता धारक प्रशिक्षकांनी कृपया आपले अर्ज कार्यालयीन वेळेमध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे दिनांक २१/०२/२०२५ रोजी पर्यंत सादर करावेत. अधिक माहिती करीता रेवननाथ शेलार यांना ९०७५४७६७९१ या भ्रमनध्वनीवर असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

### अपघातात एक ठार




**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

तेलगाव परळी महामार्गावर भोपा पाटीवर भरधाव अज्ञात टिप्परची दुचाकीला धडक बसून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला.मयताचे नाव शिवाजी गायकवाड रा.वडवणी असुन त्या धारुर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्य करता आणले समजते आहे

# मडके G - चॅम्प व अबॅकस क्लासेस च्या विद्यार्थ्यांचा आंतरराष्ट्रीय परीक्षेत घवघवीत यश

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराईतील मडके ऋ लहरा अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्यांचा भारतीय आंतरराष्ट्रीय ऑफलाइन व ऑनलाईन परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळवले आहे. मडके जि-चॅम्प अबॅकस च्या संयोजिका सौ. सरिता उद्धव मडके यांना सलग तीन वर्ष बेस्ट टीचर अवॉर्ड आणि बेस्ट फ्रेंचाईसी देऊन ऋ-लहरा अबॅकस चे संचालक श्री योगेश देशमाने सर व सौ आरती योगेश देशमाने मॅम यांनी सन्मानचिन्ह देऊन सरिता उद्धव मडके यांचा गौरव केला आहे. मडके क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी




अवघ्या सात मिनिटांमध्ये शंभर गणित सोडून भारतीय आंतरराष्ट्रीय परीक्षेमध्ये यश मिळवले त्यापैकी सात मिनिटांमध्ये शंभर पैकी १०० गणित बरोबर सोडून सुपरस्टार झालेली मुले आहेत स्वर्णिमा उद्धव मडके, साक्षी रमेश जाधव, कार्तिक महादेव साखरे, श्लोक विष्णू गायकवाड, श्रीशा अभिजीत काला, श्रीशा अशोक पिसाळ, वेदिका नामदेव खेडकर, देवेश संदीप काकडे, यांना सुपरस्टार ची ची ट्रॉफी देऊन अबॅकसचे संचालक श्री योगेश देशमाने सर यांनी गौरवले आहे. तसेच प्रथम क्रमांकावर आकांक्षा रासकर,मनसी योगेश जाजू ,आकांक्षा महेंद्र रासकर,शिवम तुकाराम खेडकर, पार्थराज जगदीश हजारे, सुप्रिया संदीप गलांडे,शिवाय अमर वादवाणी, तर द्वितीय क्रमांकावर मनमा अविनाश डेरे, उत्तरा अमोल येवले, राजवीर गणेश करांडे, पंकज उत्तम मदने, आराध्या अरुण मस्के, स्पृहा शरद भारती, संबोधी नानासाहेब कतारनवरे, रुद्र तुकाराम पौळ, यशवीर शाम कुंड, आयुष चंद्रकांत जाधव

### लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात संत रोहिदास महाराज जयंती साजरी ; मुंबई पोलीस सेवेत भरती तरूणांचा सत्कार



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.१२ फेब्रुवारी बुधवार रोजी संत रोहिदास यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव तर उपसरपंच बाळकृष्ण थोरात,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, रमेश गायकवाड, महादेव कुदळे, ग्रामपंचायत कर्मचारी जिवन मुळे, सुखदेव वाणी, कचरू निर्मळ,सुरेश निर्मळ,दादा गायकवाड, पप्पू निर्मळ, विलास काटे, विक्की जाधव,यांची प्रमुख उपस्थिती होती. .कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रविंद्र निर्मळ यांनी तर आभार प्रदर्शन चंद्रकांत आवसरे यांनी केले. प्रमुख वक्ते म्हणून संत रोहिदास यांच्या जीवनपट उलगडताना सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी संत रोहिदास यांच्या लोकप्रिय हिंदी दोहा मन चंगा तो कठौती मे गंगा विश्लेषण करताना माणसाचे मन पवित्र असेल, त्याला जातीयवादाचा स्पर्श नसेल तर चांभाराच्या कुंडातही गंगाजलाचे पावित्र्य दिसून येते.रामभक्तीत दंग असणारे रविदास महाराज हातानं चप्पल बनवत असताना तोंडाने रामनाप जप करण्यात तल्लीन असायचे. त्यांनी केलेल्या सुंदर , अर्थपूर्ण कवितांचा 'गुरू ग्रंथ साहिब या शिखांच्या धर्मग्रंथामध्ये समावेश आहे.संत रोहिदास यांनी भारतभर फिरून समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचे धडे देत देशाला अध्यात्मिक आणि सामाजिक उपदेश दिला.असे प्रतिपादन केले. याचवेळी लिंबागणेशचे भुमिपुत्र आकाश नामदेव निर्मळ आणि बुद्धभुषण हरिश्चंद्र निर्मळ या मुंबई पोलीस सेवेत भरती झालेल्या तरूणांचा ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी पिनु निर्मळ, रामदास निर्मळ, बबिता निर्मळ, विलास काटे, डिगांबर निर्मळ, आरूण निर्मळ, अमोल निर्मळ, शंकर निर्मळ यांची उपस्थिती होती.

# दहावी, बारावी विद्यार्थ्यांच्या क्रीडा ग्रेस गुणांबद्दल ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

इयत्ता १० वी व १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार प्रणालीद्वारे केवळ ऑनलाईन पध्दतीने भरणे बाबत आवाहन क्रीडा विभागातर्फे करण्यात आले आहे. याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्हयातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, प्रतिवर्षीप्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज मागविले जातात. त्या माहितीचे संकलन करुन कार्यालयाद्वारे सदरचे अर्ज माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत मंडळास ग्रेस गुण मिळणे करीता पाठविले जातात. सन २०२३-२४ पर्यंतची ग्रेस गुण प्रक्रीया काही मानवी उणीवांमुळे हे काम अचुक व दोषरहीत होणे क्लिष्ट होत होती. व त्याचा फटका विद्यार्थ्यांना त्यांच्या गुण न मिळण्याने बसत होता. या प्रश्नावर तोडगा आणि सदर सवलत गुण प्रक्रीया निर्दोष करण्यासाठी या वर्षीपासुन म्हणजेच २०२४-२५ पासुन ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रीया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे. खेळाडू विद्यार्थी / जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार पद्वारे या वर्षीपासुन सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालयास ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणार नाही व अशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालयाकडुन स्विकारला जाणार नाही.

## जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर १६५/२०२५**

**देवराव तुळशीराम दास विरूध्द निरंक**

अर्जदार - १. देवराव पि. तुळशीराम ढास, वयः ८४ वर्षे, धंदा -शेती, रा. सुलतानपुर ता. जि. बीड. २. मच्छिंद्र पि. देवराव ढास वयः ४९ वर्षे, धंदा -शेती, रा. सदर, ३. मिराबाई भ्र. शिवाजी काटवटे, वयः ५४ वर्षे, धंदा -घरकाम, रा. काटवटे वस्ती, पो. अंजनवती, ता. जि. बीड. ४. मंगल पि. शेषेराव ढास, वयः ५१ वर्षे, धंदा -घरकाम, रा. सुलतानपुर ता. जि. बीड. ५. नितीन पि. शेषेराव ढास, वयः ३५ वर्षे, धंदा -शेती, रा. सदर. ६. संदिप पि. शेषेराव ढास, वयः ३१ वर्षे, धंदा -शेती, रा. सदर, ७.मनिषा भ्र. हरि शेंडकर, वयः ३३ वर्षे, धंदा घरकाम रा. पाचग्री, ता. पाटोदा, जि. बीड

विरुध्द गैरअर्जदार- निरंक

**मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत कुसुमबाई भ्र. देवराव ढास** रा. सुलतानपुर, बीड ता. जि. बीड. यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी - कुसुमबाई भ्र. देवराव ढास रा. सुलतानपुर, ता. जि. बीड. यांचा मृत्यु दि. १४/११/२०२२ सुलतानपुर, ता. जि. बीड.येथे मयत झालेले असून अर्जदार क. १ हे मयताचे पती आहेत. अर्जदार क. २ मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क. ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. न्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्याचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत कुसुमबाई भ्र. देवराव ढास रा. सुलतानपुर, ता. जि. बीड. यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ५ माहे ०२ सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १०/०३/२०२५ आहे.

अँड. डि. एम. रोटे.

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | आदेशावरून. (स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर) शिरुर कासार यांचे न्यायालयात**

**कि.दि.अर्ज क्रमांक- २३ /२०२५**

अर्जदार :- १) सीताराम पि. बापु गुजर, वय - ६५ वर्षे, धंदा - शेती, रा- स्टेट बँक शेजारी, शिवाजी नगर, शिरुर का. ता.शिरुर कासार, जि. बीड. २) प्रदीप पि.सीताराम गुजर, वय-३९ वर्षे, धंदा - शेती, रा. सदर, ३) संदीप पि. सीताराम गुजर, वय - ३७ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर

विरुध्द कोणी नाही.

**अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

ज्यापेक्षा मयत नामे **सुमन पि. सीताराम गुजर** ही दिनांक ०९/०१/२०२४ रोजी मौजे शिरुर कासार, ता. शिरुर कासार जि. बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ हे मयताचे पती असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत.तसेच अर्जदार हे मयताचे एकमेव वारस आहे असे त्यांनी अर्जात नमुद केले आहे व अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहे. असा अर्ज केला त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने मा. कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदती कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सरदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु अपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १२/०२/२०२५ रोजी माझे सहीने व नयायालयाच्या शिक्यानिशी दिले

**पुढील तारीख ०५/०३/२०२५ हि आहे.**

ॲड. एच. एस. कोठुळे

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | आदेशावरून. (स्वाक्षरीत) सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर कासार

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. २२/१२०२५, आशा वगैरे विरुध्द निल**

अर्जदार :- १) आशा भ्र. जालिंदर मुळे वय २९ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. मु. वडाळी, ता. शिरुर कासार, जि. बीड, मो. नं. ९६७३३८९६७३. २) अनुष्का पि. जालिंदर मुळे वय १० वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. अज्ञान अ. पा. क. आई अर्जदार क्र. १ नामे आशा, ३) साई पि. जालिंदर मुळे वय ०८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. अज्ञान अ. पा. क. आई अर्जदार क्र. १ नामे आशा, ४) पार्वती भ्र. तबाजी मुळे वय ७० वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. सदर.

विरुध्द निल

**अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत...**

ज्यापेक्षा मयत नामे **जालिंदर पि. तबाजी मुळे** रा. वडाळी, ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. ०८/०९/२०२४ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजे सिप्ला फाऊंडेशन पुणे, पुणे शहर पुणे, येथे दवाखान्यामध्ये उपचारा दरम्यान मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि असुन अर्जदार क्र. २ हि अज्ञान मुलगी असुन अर्जदार क्र. ३ हा अज्ञान मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. ४ हि यमताची आई आहे. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १२/०२/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारीख - ०४/०३/२०२५**

ॲड. एच. एस. कोठुळे

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | आदेशावरून. (स्वाक्षरीत) सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर कासार

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ३८/२०२५, सुशिला वगैरे विरुध्द निल**

अर्जदार :- १) सुशिला भ्र. बबन लेहणे वय ६० वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. औरंगपुर, ता. शिरुर कासार, जि. बीड, मो. नं., २) संतोष पि. बबन लेहणे वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ३) सुनिल पि. बबन लेहणे वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ४) नवनाथ पि. बबन लेहणे वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ५) वैशाली भ्र. अनिल लेहणे वय २६ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. सदर. ६) आर्यन पि. अनिल लेहणे वय ०७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. अज्ञान अ. पा. क. आई अर्जदार क्र. ५ नामे वैशाली, ७) अमृता पि. अनिल लेहणे वय ०५ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. अज्ञान अ. पा. क. आई अर्जदार क्र. ५ नामे वैशाली,

विरुध्द निल

**अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्यापेक्षा मयत नामे **बबन पि. आण्णा लेहणे** रा. औरंगपुर तहत हिवरसिंगा, ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. १८/०९/२०२२ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजे औरंगपुर, ता. शिरुर का., जि. बीड़, येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि असुन अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क्र. ५ हि मयताचा मयत मुलगा नामे अनिल पि. बबन लेहणे यांची पत्नि असुन मयताची सुन आहे. तसेच अर्जदार क्र. ६ व ७ हे अर्जदार क्र. ५ व मयत अनिल यांचे अज्ञान आपत्ये असुन मयताचे नातु आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१२/०२/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारीख - २६/०३/२०२५**

ॲड. एच. एस. कोठुळे

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | आदेशावरून. (स्वाक्षरीत) सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर कासार

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १५/२०२५, अंबादास वगैरे विरुध्द निल**

अर्जदार :- १) अंबादास पि. शहादेव कांबळे वय २७ वर्षे, धंदा निल, रा. मु. पो. वारणी, ता. शिरुर कासार, जि. बीड, मो. नं. ९०६७२३४७१०. २) दिपाली पि. शहादेव कांबळे वय २६ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. सदर. ३) मिना भ्र. राजु रोकडे वय ३४ वर्षे, धंदा घरकाम व शेती,रा. मालेगाव (खु.) तहत उमापुर, ता. गेवराई, जि. बीड

विरुध्द निल

**अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत**

ज्यापेक्षा मयत नामे **संगिता भ्र. शहादेव कांबळे** रा. वारणी, ता. शिरुर का., जि. बीड, यांचा मृत्यु दिनांक ३१/०८/२०२४ रोजी आनंदऋषी हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, अहमदनगर, ता. जि. अहमदनगर, येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ व ३ या मयताच्या मुली आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचें वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १०/०१/२०२४ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **पुढील तारीख २७/०२/२०२५**

ॲड. एच. एस. कोठुळे

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | आदेशावरून. (स्वाक्षरीत) सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर कासार

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. के सी बागल मॅडम, ८ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालय**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : २५५/२०२५, नाना व इतर -वि.- निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **आश्रुबा पि.तुळशीराम नवले रा. पाली ता. जि. बीड हे दि. १२.०८.२०१६ रोजी मौजे पाली ता. जि. बीड** येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- १) नाना आश्रुबा नवले रा. पाली ता.जि.बीड २) मधुकर आश्रुबा नवले रा. पाली ता.जि.बीड ३) सतिष आश्रुबा नवले रा. पाली ता.जि.बीड, ४) सुमित्रा अनिरुद्र मरकड रा. टाकळगांव ता. गेवराईजि.बीड ५) राजुबाई भागवत सपकाळ रा. खांडेपारगांव ता. जि.बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे आश्रुबा पि.तुळशीराम नवले रा. पाली ता. जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज --/ ०२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **पुढील तारीख : २४/०३/२०२५**

ॲड. वाय. आर. शेळके बीड

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | आदेशावरून. (स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीरनामा

**धारुर येथील श्रीमती ए.बी.जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ४१/२०२५**

**सुनिल व इतर १ वि. निरंक**

मयताचे नावे **मयत हौसाबाई भ्र. भाऊसाहेब सोळंके** रा. मौजे हिंगणी (ब) ता. धारुर जि.बीड हे दिनांक २१/०४/२०२१ रोजी मृत्यू झालेला आहे

त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ सुनील पि.भाऊसाहेब सोळंके, वयः ५५ वर्षे, धंदा शेती रा. हिंगणी (बु) ता. धारुर जि. बीड, अर्जदार क. २ साहेबराव पि. भाऊसाहेब सोळंके, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. हिंगणी (बु) ता. धारुर जि.बीड अर्जदार क. १ व २ ही मयताची मुले आहेत. या नात्याने मयत हौसाबाई भ्र भाऊसाहेब सोळंके या नात्याने त्यांना शासकीय, निमशासकीय व इतर आवश्यक गरजेकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार क्र. १ व २ हे मयत **हौसाबाई भ्र भाऊसाहेब सोळंके** यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **मयत हौसाबाई भ्र. भाऊसाहेब सोळंके** यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :११/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : २१/०३/२०२५**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | आदेशावरून. (स्वाक्षरीत) सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, क.स्तर, धारूर

# पालकमंत्री अजितदादांचा आला गाडा आणि गोरगरीबांची घरे पाडा

## पुढारी, धनदांडग्यांना अभय ; सामाजिक कार्यकर्त्यांची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने : डॉ.गणेश ढवळे




**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना बीड शहर स्वच्छ आणि सुंदर दिसावे यासाठी आज पहाटे नगर रोडवरील सामाजिक न्याय भवन आदि ठिकाणी असणारी चहाचे हातगाडे, टपरीधारक तसेच फुल विक्रेते, आदि हातावर पोट भरणा-या गोरगरिबांच्या साहित्यांची नासधूस करून वाहनात टाकुन घेऊन जाण्याची मर्दुमकी नगर परिषद प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांनी दाखवली वाहतुकीस अडथळा अथवा अपघाताला निमंत्रण न करणारी गोरगरीबांचे हातगाडे ,टपरी उचलून नेताना बीड शहरातील प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमित बांधकामे त्याच बरोबर बिंदुसरा नदीपात्रात फ्लड झोन ,पुररेषेत असणारी अतिक्रमित बांधकामे, भुमाफियांनी नगरपरिषद आधिका-यांशी संगनमताने केलेली प्लॉटिंग याकडे सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संघटना यांनी दिलेले निवेदने व आंदोलने याकडे सोयीस्करित्या दुर्लक्ष करणाऱ्या नगरपरिषद प्रशासनाने भूमिका घेऊ नये सर्वांना समान न्याय द्यावा या मागणीसाठी आज दि.१२ बुधवार रोजी दुपारी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ते डॉ .गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना नितीन सोनवणे, बीड शहर सचिव वंचित बहुजन आघाडी संदिप जाधव, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया कार्याध्यक्ष राजु कांबळे , शेख मुस्ताक, आबासाहेब जगताप, शेख अकबर आदी सहभागी होते. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.

नगर रोडवरील सामाजिक न्याय भवनासमोर शेख अकबर यांची कित्येक वर्षांपासून चहाची टपरी आहे.दोन मुले एक आठवी आणि दुसरा ६ वीत शिकत आहेत. बालेपीर भागात राहणारे शेख अकबर यांच्या कुटुंबाचा चरितार्थ त्यावरच चालायचा आज नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी टपरी तोडुन मोडुन गाडीत टाकून घेऊन गेले आता पुढे घर चालवायचे कसं असा त्यांना प्रश्न पडला आहे.

# चेक देऊन फसवणूक केल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता : ॲड योगेश टेकाडे



**बीड । प्रतिनिधी**

दोन लाख रुपयाचा चेक देऊन फसवणूक केल्याच्या आरोपातून श्रीमंत डोरले यांची निर्दोष मुक्तता प्रकरणाची हकीकत आशी की, फिर्यादी नामे वैजिनाथ माणिक पावसे व आरोपीश्रीमंत भगवानराव डोरले यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते फिर्यादी हा मौजे हिंगनी तालुका आष्टी जिल्हा बीड येथील कायमस्वरूपी रहिवासी असून तो बीडला आल्यानंतर आरोपी श्रीमंत भगवानराव डोरले यांच्याकडे नेहमी जात येत असे. त्यामुळे त्या दोघांचे प्रेमाचे मैत्रीपूर्ण संबंध होते आरोपीला आपला टायपिंगचा व्यवसाय डेव्हलप करण्यासाठी व कोर्ट मॅटर साठी पैशाची गरज पडली त्यामुळे आरोपीने फिर्यादीस दोन महिन्याच्या मुदतीसाठी रक्कम रुपये दोन लाख ची मागणी केली.

सदरील प्रकरणात फिर्यादी पक्षाकडून एकूण तीन साक्षीदार तपासण्यात आले आरोपीचे वकील ॲड.योगेश टेकाडे यांनी घेतलेला अभ्यासपूर्ण उलटपास व बचाव न्यायालयाने ग्राह्य धरून एम के पाटील न्यायाधीश साहेब आष्टी यांनी आरोपीची सबळ पुरावे अभावी निर्दोष मुक्तता केली.. विशेष ता अशाप्रकारच्या चेक बाउन्स केस मध्ये आरोपीला शिक्षा दिली जाते परंतु आरोपीच्या वकिलानी केले ला युक्तिवाद ग्राह्य धरण्यात आला त्याची निर्दोष मुक्तता केली आरोपी च्या वतीने ॲड.योगेश टेकाडे यांनी काम पाहिले. त्यांना ॲड.सुधीर खाडे, ॲड.प्रवीण खाडे ॲड.अजय हुंबे यांनी सहकार्य केले . सदरील केसकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

# संत सेवालाल महाराज जयंती उत्सव कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी पृथ्वीराज पंडित



**गेवराई । प्रतिनिधी**

संत सेवालाल महाराज जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवा नेते पृथ्वीराज पंडित यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली असून संत सेवालाल महाराजांची जयंती विविध समाज उपयोगी उपक्रम घेऊन साजरी करणार असल्याचे पृथ्वीराज पंडित यांनी यावेळी सांगितले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. संत सेवालाल महाराज यांच्या २८७ व्या जयंती उत्सवानिमित्त आयोजित केलेल्या बैठकीला युवानेते पृथ्वीराज पंडित, भवानी बँकेचे संचालक दीपक आतकरे, विनोद सौंदरमल, उत्तमराव सोलाने, रामेश्वर पवार, अनिल राठोड, अजिम इमानदार, सतीश दाभाडे यांच्यासह बंजारा समाजबांधव उपस्थित होते. यावेळी संत सेवालाल महाराज जयंती उत्सव कार्यकारणीची निवड करण्यात आली. कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी युवा नेते पृथ्वीराज पंडित, उपाध्यक्षपदी रवी पवार, सरपंच शीतल साखरे, कमलेश वाघमारे, शेखर हुंबे यांची तर कार्याध्यक्षपदी सोम नाथ गिरगे, सचिवपदी शेख रहीम, सहसचिव पदी अमित सौंदरमल, कोषाध्यक्षपदी अमोल राठोड, संघटपदी सतिश प्रधान तसेच सल्लागार समितीमते समाजाती सर्व कर्मचारी, राजकीय व सामाजिक पक्ष संघटनाचे पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणीच्या बैठकीचे संचलन सुनील चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार अनिल राठोड यांनी मानले. यावेळी बंजारा समाजातील कार्यकर्ते तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माता रमाई आंबेडकर जयंती व माघ पौर्णिमा महत्वाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर व परिसरातील धम्मप्रेमी सर्व बौद्ध उपासक उपासिका यांना कळविण्यात येते की प्रतिवर्षाप्रमणे याहिवर्षी त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवाच्या निमित्ताने व माघ पौर्णिमेच्या अनुषंघाने प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीडच्या वतीने विविध कार्यक्रमाचे अयोजन महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर शिवणी ता. जि.बीड या ठिकाणी गुरुवार दि.१३ फेब्रुवारी २०२५ रोजी दु.ठिक १२:०० वाजता करण्यात आले आहे.

यावेळी प्रमुख धम्मदेसना पु.भिक्खु महाविरो थेरो,(काळेगांव, अहमदपूर) यांची लाभणार आहे तर मी रमाई बोलतेय हे एकपात्री नाट्य प्रयोग

रमाईकार कु. डॉ.वैभवी कांबळे ( घारगांवकर, लातुर), सादर करणार आहेत. याप्रसंगी विविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. ज्यांना सहभाग नोंदवायचा आहे त्यांनी संपर्क साधावा व आपली नांव नोंदणी करावी. नांव नोंदणी व दान जमा करण्यासाठी संपर्क: अलकाताई डोंगरे-९०२१७८६३३१, वंदनाताई वाघमारे-९२८४९७६८१९, पंचशीलाआई सरपते- ९५१८७११९३६, शितलताई पालके-७२४८९६६२२७, ऋतुजा डोळस-९३७०११५८६१

कार्यक्रमाप्रसंगी उपासिका मंगलताई सोनवणे बीड यांच्या परिवाराच्या वतीने उपस्थित सर्वांना खीरदान देण्यात येणार आहे.

तरी हजारोंच्या संख्येने धम्मप्रेमी उपासक-उपासिका यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य संयोजक व प्रियदर्शी धर्म संस्कार शिक्षण संस्था बीड चे सचिव पु.भिक्खु धम्मशील थेरो, (महाविहार धम्मभूमी शिवणी) व कार्यक्रमाचे संयोजक, प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीड, शिवनी येथील समस्त उपासक उपासिका यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी नेहमी अव्वलस्थानी राहण्याच्या ध्येयाने काम केले पाहिजे

## संवेदनशील लेखक अरविंद जगताप यांचे प्रतिपादन




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील योगेश्वरी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेह संमेलन दिनांक ८ ते १० फेब्रुवारी दरम्यान यशस्वीपणे संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण व समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संवेदनशील लेखक,चला हवा येऊ या खळखळून हसवणाऱ्या कार्यक्रमातील ज्यांच्या संवेदनशील पत्रलेखनाने सर्वांच्या डोळ्यात पाणी आणले असे मराठी चित्रपट पटकथा व संवाद लेखक मा. अरविंद जगताप यांना आमंत्रित करण्यात आले होते. अरविंद जगताप यांनी आपल्या भाषणाद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी नेहमी अव्वलस्थानी राहण्याच्या ध्येयाने काम केले पाहिजे असे प्रतिपादन केले. प्रत्येकाने नेतृत्व करण्याची क्षमता स्वतः मध्ये विकसित केली पाहिजे. विद्यार्थ्यांनी खरकटे होण्यात आपले आयुष्य घालवू नये आणि कोणाचीतरी चमचेगिरी करण्यात धन्यता मानु नहा असा संदेश दिला.

# आई-वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत

## संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**केज । प्रतिनिधी**

ध्येय निश्चित केल्याच यश प्राप्ती होते. आई वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते नायगाव येथील संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सहशिक्षक माधव गायकवाड, प्रमुख उपस्थिती मुख्याध्यापक कावळे एल डी, छात्र मुख्याध्यापक सौरभ खोडसे,सहशिक्षक श्री सोमवंशी, श्री राऊत, श्री वाघमारे, संतोष अडसूळ, गोविंद कुडके, आदींची होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री राऊत यांनी करून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. पुढे बोलतांना म्हणाले कॉपी पासून दूर राहा.शिक्षणाचा उपयोग व्यवहारीक जीवनामध्ये केला पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाशी आपला संबंध जोडलेला असतो. शिक्षण घेत असताना आपण सर्वप्रथम आपला मार्ग शोधला पाहिजे तरच आपल्याला ते ध्येय साकार करता येईल. विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांशी प्रमाणिक राहून अभ्यास करावा यामुळे आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करता येईल असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थिनी ऋतुजा सोमवंशी वैष्णवी गुजर यांनी केले कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# वडवणी व्यापारी संकूल गाळे लिलाव प्रक्रियेत व्यवसायिकांनी सहभाग घ्यावा

## नगराध्यक्ष शेषेराव जगताप व उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांचे आवाहन



**वडवणी । प्रतिनिधी**

शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात नगरपंचायतीने बांधलेले व्यापारी संकूलातील जवळपास ८८ दुकाने (गाळे) बांधकाम करुन अनेक दिवसांपासून त्यांची लिलावाची प्रक्रिया रखडलेली होती. मात्र आता गाळ्यांची ई-लिलाव पध्दतीने प्रक्रिया सुरु झालेली आहे. तरी आता सदरील ई-लिलाव या प्रक्रियेत जास्तीत जास्त व्यवसायिकांनी भाग घेवून या व्यापारी संकूलातील दुकाने नगरपंचायतीकडून भाडेतत्त्वावर घ्यावीत असे आवाहन नगराध्यक्ष शेषेराव जगताप व उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांनी केले आहे. शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात नगरपंचायतीने बांधलेले व्यापारी संकूलातील जवळपास ८८ दुकाने (गाळे) बांधकाम करुन अनेक दिवसांपासून त्यांची लिलावाची प्रक्रिया रखडलेली होती. त्यामागे कारणही तसंच होते. सदरील व्यापारी संकुलातील गाळे भाडेतत्त्वावर देण्यासाठी पूर्वी केवळ तीन वर्षांचीच मुदत होती आणि अधिमूल्य रक्कम विनापरतावा होती. त्यामुळे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी सदरील लिलाव प्रक्रियेवर स्थगिती आणून या गाळ्यांची भाडेतत्त्वावर देण्याची मुदत तत्कालीन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून तीन वर्षे ऐवजी तीस वर्षांसाठी सदरील गाळे भाडेतत्त्वावर देण्याची परवानगी आणली होती. याबध्दल वडवणी शहरातील व्यापारी व व्यावसायिकांच्या वतीने आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे आभार मानण्यात आले होते.

# मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी व्यापाऱ्यांना पालिकेकडून सूचना

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नागरी रुग्णालय धारूर या मुख्य रस्त्याचे नूतनीकरण होणार असल्याने आज पासून सर्वे चे काम करण्यात येणार असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पहाणीत मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याचे दिसून आलेले असल्याने धारूर नगर परिषदेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते काशिनाथ चौक पर्यंत रस्त्यालगत असलेल्या व अतिक्रमण केले असलेले व्यापार्यांना मुख्य रस्त्यावर अतिक्रमण काढून घेण्याच्या नगरपरिषदेच्या वतीने पत्र देऊन सूचना केल्या आहेत. धारूर शहरातील मुख्य रस्त्याचे नूतनीकरण अनेक दिवसापासून रखडलेले होते यासंदर्भात येथील व्यापारी अनेक वेळा नगरपरिषदेला रस्त्याचे नुतीकरण करण्यासंदर्भात अर्ज फाटे केले होते याची दखल घेऊन आ. प्रकाश सोळंके यांनी या रस्त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिलेला असून आता या रस्त्याचे नूतनीकरणाचे काम सुरू होणार आहे तत्पूर्वी आज पासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने या रस्त्याचा सर्वे करण्यात येणार आहे त्या दृष्टीने सा. बा. विभागाच्या वतीने पाहणी केली असता या रस्त्यालगत असलेल्या नालीवर कठडे, पायर्या, ओठे मोठ्या प्रमाणावर असल्याचे आढळून आले असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने नगर परिषदेला पत्र देऊन रस्त्यावर असलेले अतिक्र मण काढून घेण्याचे सांगण्यात आले आहे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पत्राची दखल घेऊन धारूर नगर परिषदेने रस्ता काम करत असताना कसलेही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये म्हणून मुख्य रस्त्यावर अतिक्रमण असलेल्या व्यापायर्यांना नोटीसा दिल्या असून दिलेल्या नोटीशीत मुख्य रस्त्याचे काम दि. २० फेब्रुवारीपासून सुरू करण्यात येणार आहे.

# सेवानिवृत्त अधीक्षक उमेश राठोड यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा सत्र न्यायालयातून अधीक्षक म्हणून सेवानिवृत्त झालेले उमेश हरिलाल राठोड यांचे कुंभमेळा प्रयागराज येथे जात असताना त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने न्यायालयीन वर्तुळात शोककळा पसरली आहे. न्यायालयीन सेवेत मोलाची भूमिकाउमेश हरिलाल राठोड यांनी बीड जिल्हा सत्र न्यायालयात अनेक वर्षे सेवा बजावली होती.

# आदित्य कृषि महाविद्यालयाच्या आठ विद्यार्थ्यांची वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या संघात निवड



**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेचा शिक्षण क्षेत्रात दबदबा कायम असताना क्रीडा क्षेत्रातही मागे नसल्याचं कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले. गडचिरोली येथे १८ ते २२ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या विविध संघामध्ये आदित्य कृषि महाविद्यालयाच्या आठ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी सदरील खेळाडूची निवड ही विद्यापीठ अंतर्गत असलेल्या विविध कृषी व संलग्न महाविद्यालयाच्या स्पर्धा घेऊन विद्यापीठाचे तज्ज्ञ क्रीडा अधिकारी यांच्यामार्फत केली जाते. या स्पर्धा गोडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे १८ ते २२ फेब्रुवारी २०२५ दरम्यान होत आहेत. या निवडीबद्दल संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कल्याण आपटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

